26 APR 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. प्रतापसिंह जाधव यांचे प्रबोधनाचे कार्य समाजाला चांगल्या दिशेला नेणारे

## ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांचे गौरवोद्‌गार

### शानदार समारंभात प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार प्रदान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. ते कोणाच्या हातात जाते, त्यावर ते चांगले की वाईट ठरणार आहे. सर्वांचे सक्षमीकरण होईल, कोणाचेही शोषण होणार नाही, असा तंत्रज्ञानाचा वापर व्हायला हवा. त्यासाठी तसा वापर करणारी पिढी निर्माण झाली पाहिजे. यासाठी महत्त्वाचे असलेले शिक्षण आणि प्रबोधनाचे कार्य डॉ. कणबरकर आणि डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी केले आहे. डॉ. कणबरकर यांच्या नावाचा पुरस्कार आणि पुरस्कार स्वीकारणारे डॉ. जाधव हा अपूर्व मिलाप आहे. तो समाजाला चांगल्या दिशेला नेणारा आहे, असे गौरवोद्‌गार ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ, राजीव गांधी विज्ञान आयोगाचे अध्यक्ष, डॉ. अनिल काकोडकर यांनी गुरुवारी काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार डॉ. काकोडकर यांच्या हस्ते दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांना शानदार समारंभात प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी

पान ८ वर ›




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते डॉ. प्रतापसिंह जाधव यांना प्रदान करण्यात आला. यावेळी उपस्थित कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. बी. ए. खोत, डॉ. अरुण कणबरकर. (छाया : पप्पू अत्तार)

### डॉ. प्रतापसिंह जाधव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव

पुरस्कार सोहळ्यानंतर सभागृहात उपस्थित विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी व्यासपीठावर येऊन डॉ. प्रतापसिंह जाधव यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. अभिनंदन करण्यासाठी व्यासपीठावर मान्यवरांची मांदियाळी होती. विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी डॉ. जाधव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला.

### रा. कृ. कणबरकर शिष्यवृत्ती सुरू करणार

डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी पुरस्काराच्या रकमेसह तेवढीच रक्कम विद्यापीठास जाहीर केली. या रकमेतून रा. कृ. कणबरकर यांच्या नावे शिष्यवृत्ती सुरू करण्याची सूचना विद्यापीठास केली. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी ही सूचना मान्य करून तातडीने प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून शिष्यवृत्ती लवकरात लवकर सुरू करण्याची ग्वाही यावेळी दिली.

2 6 APR 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठातर्फे प्राचार्य रा. कृ. कणबरकर स्मृती पुरस्कार डॉ. प्रतापसिंह जाधव यांना डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते प्रदान केला. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. बी. ए. खोत, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अरुण कणबरकर उपस्थित होते. (छाया : नसीर अत्तार)

# तंत्रज्ञान चांगल्या विचारांच्या हाती यावे

## डॉ. अनिल काकोडकर : डॉ. प्रतापसिंह जाधव कणबरकर पुरस्काराने सन्मानित

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : चांगल्या बाजूचा विचार करणारी पिढी पुढे आली तर तंत्रज्ञानातून वाईट घडणार नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी गुरुवारी केले. एका बाजूला तंत्रज्ञान वेगाने वाढत आहे, तर सामाजिक आणि सामायिक स्तरावर कृत्रिम बुद्धिमत्ता विध्वंसक शक्ती म्हणून पुढे येत आहे. तंत्रज्ञान हे चांगले की वाईट याची चर्चा होत असताना चांगल्या व्यक्तीच्या हाती ते पडले तरच त्याचा वापर चांगल्या अर्थाने होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### चांगल्या समाजनिर्मितीसाठी वापर व्हावा

डॉ. काकोडकर म्हणाले, तंत्रज्ञानामुळे होणाऱ्या शोषणामुळेच महात्मा गांधी यांनी तंत्रज्ञानाला विरोध केला हे समजून घेतले पाहिजे. सर्वांचे सक्षमीकरण ही भावना त्यामागे होती. जीवनमूल्यांशी प्रामाणिकता, पाशवी वृत्तीवरील नियंत्रण, मूल्य संवर्धनाची क्षमता आणि सामाजिक जडणघडणीचा विचार तंत्रज्ञानाच्या सकारात्मक वापराला प्रेरणा देतात. शोषणविरहित आणि सर्वांचे सक्षमीकरण अशा पद्धतीने तंत्रज्ञानाचा वापर होणे चांगल्या समाजनिर्मितीसाठी आवश्यक आहे. त्यात शिक्षण आणि समाजप्रबोधनाचे महत्त्व मोठे आहे.

शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांना 'प्राचार्य डॉ. रा. कृ. कणबरकर पुरस्कार' देऊन काकोडकर यांच्या हस्ते सन्मानित केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, मानपत्र, ग्रंथभेट, पुष्पगुच्छ आणि एक लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश असे या पुरस्काराचे स्वरूप होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठातील ललितकला विभागाच्या स्थापनेसाठी कुलगुरू कणबरकर यांच्याबरोबर डॉ. जाधव यांनीच पुढाकार घेऊन ४० लाखांची रक्कम उभारली. डॉ. जाधव यांनी या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कोल्हापूरची लालमाती आणि पंचगंगेच्या काठावरील मातीमुळेच मला हा पुरस्कार मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

प्राचार्य डॉ. बी. ए. खोत यांनी प्रास्ताविक केले. मानपत्राचे वाचन डॉ. भालबा विभूते यांनी केले. डॉ. अरुण कणबरकर यांनीही डॉ. जाधव यांचा सत्कार केला. नंदिनी पाटील आणि धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमास 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले, डॉ. योगेश जाधव, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. बी.पी. साबळे, डॉ. नमिता खोत, डॉ. अंजली साबळे, डॉ. विलास साळुंखे, वसंतराव मुळीक उपस्थित होते.

26 APR 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पद्मश्री डॉ. जाधव यांच्या वक्तव्यातूनच वैचारिकतेची झलक

## ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. अनिल काकोडकर यांचे प्रतिपादन : डॉ. जाधव यांना प्राचार्य कणबरकर पुरस्कार प्रदान

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव यांची पत्रकारिता म्हणजे व्रत आणि प्रामाणिक व्यवहाराचे मूर्तीमंत उदाहरण आहे. पत्रकारितेमध्ये प्रबोधनाचे कार्य उच्च मानून अन्यायग्रस्तांसाठी आधारस्तंभ म्हणून तिचा वापर त्यांनी केला. लोकशाहीत लोकशिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी केलेले प्रयत्न महत्वाचे आहेत. डॉ. जाधव यांच्या वक्तव्यातूनच त्यांच्या वैचारिक, तात्त्विक आणि मानसिक उंचीची झलक पाहावयास मिळते, असे गौरवोद्गार ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार दैनिक पुढारीचे मुख्य संपादक पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव यांना डॉ.



कोल्हापूर : पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव यांना शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार प्रदान करताना डॉ. अनिल काकोडकर, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. बाबासाहेब खोत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अरुण कणबरकर.

काकोडकर यांच्या हस्ते राजर्षी शाहू सभागृहात प्रदान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, मानपत्र, ग्रंथभेट, पुष्पगुच्छ आणि १ लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश असे पुरस्काराचे स्वरूप होते. डॉ. जाधव यांनी पुरस्काराच्या १ लाख ५१ हजार रुपयांच्या रकमेमध्ये स्वत:कडील तितक्याच रकमेची भर घालून त्यामधून प्राचार्य डॉ. कणबरकर यांच्या नावे विद्यापीठाने शिष्यवृत्ती सुरू करावी, असा प्रस्ताव ठेवला आहे. डॉ. काकोडकर म्हणाले, प्रगल्भ समाजामधील जीवनमूल्यांशी प्रामाणिकता, पशवी वृत्तीवरील नियंत्रण, मूल्यसंवर्धनाची क्षमता आणि सामाजिक जडणघडणीचा विचार या बाबी तंत्रज्ञानाच्या सकारात्मक वापराला प्रेरणा देतात.

डॉ. प्रतापसिंह जाधव म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने प्रदान केलेला पुरस्कार कोल्हापूरच्या जनतेचा तसेच 'पुढारी'च्या वाचकांचा सन्मान आहे. प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मालवा विभुते यांनी मानपत्राचे वाचन केले. कणबरकर कुटुंबियांतर्फे डॉ. अरुण कणबरकर यांनी शाल व श्रीफळ देऊन डॉ. जाधव यांचा सत्कार केला. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले

2 6 APR 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. जाधव यांची पत्रकारिता व्रत आणि प्रामाणिक व्यवहाराचे प्रतीक

## पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर : प्राचार्य कणबरकर पुरस्काराने सन्मान



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव यांची पत्रकारिता म्हणजे व्रत आणि प्रामाणिक व्यवहार यांच्या संतुलनाचे मूर्तिमंत उदाहरण तथा प्रतीक आहे, असे गौरवोद्‌गार ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा.कृ. कणबरकर पुरस्कार-२०२४ दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव यांना डॉ. काकोडकर यांच्या हस्ते राजर्षी शाहू सभागृहात प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. भालबा विभूते यांनी मानपत्राचे वाचन केले. कणबरकर कुटुंबीयांतर्फे डॉ. अरुण कणबरकर यांनी शाल व श्रीफळ देऊन डॉ. जाधव यांचा सत्कार केला. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. योगेश जाधव, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, माजी कुलगुरू डॉ. बी.पी. साबळे, डॉ. वसंत भोसले, डॉ. नमिता खोत, डॉ. अंजली साबळे यांच्यासह कणबरकर कुटुंबीय उपस्थित होते.


यावेळी डॉ. जाधव यांनी पुरस्काराच्या १ लाख ५१ हजार रुपयांच्या रकमेमध्ये स्वत:कडील तितक्याच रकमेची भर घालून त्यामधून प्राचार्य डॉ. कणबरकर यांच्या नावे विद्यापीठाने शिष्यवृत्ती सुरू करावी, असा प्रस्ताव ठेवला. त्याचा स्वीकार करून हा प्रस्ताव अधिकार मंडळांसमोर घेऊन जाण्याची ग्वाही कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 APR 2024 पुढारी

# महर्षी शिंदे यांच्या वाङ्‌मयातून संपन्न व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार

## किशोर बेडकिहाळ; शिवाजी विद्यापीठात ग्रंथावर चर्चासत्र



**कोल्हापूर : विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथ प्रकाशनप्रसंगी किशोर बेडकिहाळ, प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील व मान्यवर.**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेखन वैचारिक, सामाजिक आशयाबरोबर वाङ्‌मयीन गुणवत्तादृष्ट्या श्रेष्ठ स्वरूपाचे होते. महर्षी शिंदे यांच्या संवेदनशील व संपन्न व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार त्यांच्या ललित लेखनात आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जयंतीनिमित्त प्रा. एन. डी. पाटील प्रतिष्ठान यांच्या वतीने प्रकाशित डॉ. विजया पाटील-वाडकर लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ललित लेखन' या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभ प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य टी. एस. पाटील यांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या बहुजनवादी राजकारण व सामाजिकतेचे वेगळेपण नमूद केले. २१ व्या शतकातही निर्भीड विचारांचे दार्शनिक अशी ओळख असणाऱ्या महर्षी शिंदे यांच्या कार्याचे व या ग्रंथाचे अनेक पैलू त्यांनी उलगडून दाखविले. अध्यक्षस्थानावरून बोलताना वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, महर्षी शिंदे यांच्या विचारविश्व आणि लेखनशैलीने महाराष्ट्राचे मन व हृदय घडविले आहे. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. विजया पाटील, राहुल पवार यांनी मनोगत व्यक्त केले. राजेश पाटील यांनी आभार मानले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. राजन गवस, राहुल पवार, सुरेश शिपुरकर, डॉ. माया पंडित, शरद नावरे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, अशोक वाडकर, वसंतराव मुळीक उपस्थित होते.

26 APR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'संख्याशास्त्र'चे ३२ विद्यार्थी शासकीय सेवेत

## वर्षभरामधील यश; शिवाजी विद्यापीठाच्या नावलौकिकात भर

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातील ३२ विद्यार्थ्यांनी गेल्या वर्षभरामध्ये विविध सांख्यिकी पदावर यश मिळविले आहे. शासनाच्या विविध विभागांद्वारे यासाठी पदभरती करण्यात आली.

शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचानालयाद्वारे संशोधन अधिकारी पदासाठी आयोजित परीक्षेमध्ये सरिता वारके, नीलम पाटील यांची निवड झाली आहे. पृथ्वीराज झांबरे, निकेत जाधव यांची इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चतर्फे राष्ट्रीय पोषण संस्था- हैदराबाद व राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थान, पुणे येथे तांत्रिकी सहाय्यक म्हणून निवड झाली आहे. मुकुंद वाचणकर, सुवर्णा मळावे, सोनम लंगुटे, आदिनाथ पाटील, विशाखा पाटील हे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन दलाचे प्रमुख) कार्यालय येथे वरिष्ठ व कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक म्हणून रुजू झाले आहेत.



### बहुतांश विद्यार्थी ग्रामीण भागातील

■ 'यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण भागातून आलेले आहेत. त्यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विभागप्रमुख डॉ. एस. बी. महाडिक यांचे प्रोत्साहन लाभले. संख्याशास्त्र विभागाद्वारे विद्यार्थ्यांना यूपीएससी व एमपीएससी, भारतीय रिझर्व्ह बँक, भारतीय रेल्वे, अर्थ व सांख्यिकी संचनालय, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ आदीद्वारे आयोजित स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन केले जात असल्याचे डॉ. महाडिक यांनी सांगितले.

विशाल झिटे, प्रतीक दामते, ओंकार पाटील, प्राजक्ता जाधव, माधुरी नाझरे, शुभांगी स्वामी, मेघना साळवे, आदिनाथ पाटील, दीपाली करणे, वैभव सुरशे, विक्रांत रास्ते, उत्कर्ष शेलार, सोनम साठे, सृष्टी मोरे, निकेत जाधव, स्वप्नाली पवार, शुभांगी शेळके, सोनम लंगुटे, सुवर्णा माळवे, किरण चोथे यांची सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये सांख्यिकी अन्वेषक म्हणून निवड झाली आहे. दादासाहेब गोडसे, शिल्पा पाटील, शाईन मुजावर, सुनील मोरे, ओंकार पाटील, शुभांगी पाटील, कृष्ण माळी, श्रुती ओतारी, अशोक भोसले हे विविध महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापकपदी ते रुजू झाले. विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश विद्यापीठाचा नावलौकिक वाढविणारे आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 APR 2024
पुढारी

# विद्यापीठ उन्हाळी सत्रातील परीक्षेला ४ हजार १७७ विद्यार्थी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला ४ हजार १७७ विद्यार्थी बसले त्यापैकी ४४२ विद्यार्थी अनुपस्थित होते.

विद्यापीठ उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरू झाल्या आहेत. गुरुवारी १९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये झाल्या. दरम्यान, दि. २५ रोजी बी.व्होक टुरिझम, बी.व्होक टुरिझम अँड इंडस्ट्री, बीएस्सी आदी आठ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.

आजअखेर १३९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले. भरारी पथकाकडून कोल्हापूर-१६ व सातारा-२ असे या दोन जिल्ह्यांतून १८ गैरप्रकाराची नोंद झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.